बुधवार दि. १७ फेब्रुवारी २०१६

३

गोवन वार्ता

# कवीच्या सर्वांगातून उमटते तीच खरी कविता : लोहकरे

प्रतिनिधी
गोवन वार्ता

**दोडामार्ग** : कवितेचा संबंध हा अनेक पिढ्यांपासून मानवाशी जोडलेला आहे. बाळ जन्मल्यापासून त्यास झोपवताना आई गाणे गुणगुणते, जात्यावर दळत असताना मांडीवर डोके ठेवून ऐकू येणाऱ्या ओव्या, लोकगीते, सण-उत्सवाची गाणी, शेतातली गीते या साऱ्यांचे संस्कार आपल्यावर होत असतात. त्यातूनच कविता जन्माला येते. ती लिहावी लागत नाही. सर्वांगातून उमटते तीच खरी कविता असते, असे विचार डॉ. संजय लोहकरे यांनी व्यक्त केले.

येथील शासकीय महाविद्यालयात मराठीचे भाषा व वाङ्‌मय मंडळाच्यावतीने 'कविता : एक साहित्य प्रकार' या विषयावर डॉ. संजय लोहकरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ.व्ही.ए.पाटील व मराठी भाषा व वाङ्म:य मंडळाचे प्रमुख प्रा. दिलीप बर्वे उपस्थित होते. डॉ. लोहकरे यांनी कवितेचे घटक, आशय, प्रतिमा, प्रतिके, जीवन जाणिवा या कवितेतून कशा अभिव्यक्त होतात, याविषयी आपल्या खास शैलीत सांगितले. या व्याख्यानाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिलीप बर्वे यांनी केले.